# प्रकरण - IV

# जल जीवन अभियानाची अंमलबजावणी

# प्रकरण IV


## जल जीवन अभियानाची अंमलबजावणी

झेडपी आणि एमजेपी या जेजेएमच्या मुख्य अंमलबजावणी संस्था आहेत. झेडपी पाच कोटी पर्यंतच्या खर्चाचे डब्ल्युएसएस राबवते, तर एमजेपी पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचे प्रकल्प राबवते. पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुधारण्यासाठी जीएसडीए, झेडपी आणि एमजेपी यांना तांत्रिक सेवा आणि नाविन्यपूर्ण उपाययोजनांद्वारे सहाय्य करते. डब्ल्युएसएस आणि एफएचटीसीची कामे अनुक्रमे झेडपी/एमजेपी आणि ग्रामपंचायतींद्वारे स्वतंत्रपणे पार पाडली गेली. राज्यात 2019-24 या कालावधीत एकूण 51,560 डब्ल्युएसएस प्रकल्प सुरू करण्यात आले, त्यापैकी 12,703 प्रकल्प पूर्ण झाले आणि 38,857 प्रकल्प प्रगतीपथावर होते. या 38,857 प्रकल्पांपैकी 929 प्रकल्प एमजेपीद्वारे आणि उर्वरित प्रकल्प झेडपींद्वारे राबवले जात होते. डब्ल्युएसएस प्रकल्पांच्या अंमलबजावणीवरील महत्त्वपूर्ण निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

### 4.1 महाराष्ट्रात जल जीवन अभियानांतर्गत घरगुती नळजोडणीची प्रगती

जेजेएम राज्याच्या 34 जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आले असून, या उपक्रमाच्या सुरुवातीला (ऑगस्ट 2019) 138.54 लाख कुटुंबे होती, त्यापैकी 48.44 लाख कुटुंबांकडे नळजोडणी होती. 15 ऑगस्ट 2019 आणि 31 मार्च 2024 रोजीची एफएचटीसीची स्थिती **तक्ता 5** मध्ये दर्शविली आहे:

**तक्ता 5: महाराष्ट्रातील घरोघरी नळजोडणीची प्रगती**




*स्रोत: विभागाने दिलेली माहिती आणि जेजेएम डॅशबोर्डवर उपलब्ध असलेली माहिती*

*टीप: 129.05 लाख नळजोडणीमध्ये खाजगी/स्वस्रोताकडून घेतलेल्या 27.74 लाख नळजोडणीचा समावेश आहे.*

महाराष्ट्रामध्ये मार्च 2024 पर्यंत एफएचटीसीचे (खाजगी/स्वस्रोताकडून नळजोडणीसह) उद्दिष्ट 125.01 लाख (85.15 *टक्के*) होते, जे डिसेंबर 2024 पर्यंत किंचित वाढून 129.05 लाख (87.90 *टक्के*) झाले. डिसेंबर 2024 पर्यंतच्या 129.05 लाख एफएचटीसीमध्ये खाजगी/स्वस्रोताकडून मिळालेल्या 27.74 लाख नळजोडण्यांचा समावेश होता, ज्या जेजेएम अंतर्गत समाविष्ट करायच्या राहिल्या होत्या. अशाप्रकारे, जेजेएम अंतर्गत प्रदान केलेल्या पूर्ण एफएचटीसीचा विचार करता, डिसेंबर 2024 पर्यंत 101.31 लाख म्हणजेच 69 *टक्के* काम पूर्ण झाले होते. पुढे, 2019-24 या कालावधीत राज्यात एकूण 51,560 डब्ल्युएसएस सुरू करण्यात आल्या, त्यापैकी 24.64 *टक्के* (12,703) पूर्ण झाल्या होत्या आणि 75.35 *टक्के* (38,857) चालू होत्या, जसे की ***परिच्छेद 4.1.2*** मध्ये चर्चा केली आहे. त्यामुळे, तरतूद केलेल्या एफएचटीसी पूर्णपणे कार्यान्वित नसतील, कारण 75.35 *टक्के* डब्ल्युएसएस अजूनही अपूर्ण आहेत.

निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये, मार्च 2024 पर्यंत एफएचटीसीची साध्यता 22.45 लाख (82.72 *टक्के*) इतकी होती. 22.45 लाख एफएचटीसीपैकी 10.43 लाख एफएचटीसी खाजगी/स्वस्रोताकडून होत्या. जेजेएम निधी द्वारे प्रदान केलेल्या एफएचटीसीची संख्या, म्हणजेच 12.02 लाख एफएचटीसी विचारात घेता, कामगिरी 44.29 *टक्के* होती. ठाणे आणि पुणे येथे एफएचटीसी (खाजगी/स्वस्रोताकडून वगळून) प्रदान करण्याच्या बाबतीत कामगिरी अनुक्रमे 18.71 *टक्के* आणि 19.30 *टक्के* होती, तर कोल्हापूरमध्ये ती 81.63 *टक्के* होती. निवडलेल्या जिल्ह्यांपैकी कोणीही मार्च 2024 पर्यंत 100 *टक्के* एफएचटीसी साध्य केले नाही. निवडलेल्या जिल्ह्यांमधील एफएचटीसीच्या प्रगतीचा तपशील ***परिशिष्ट IV*** मध्ये दर्शविला आहे. पुढे, निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये डब्ल्युएसएसची प्रगती 16.57 *टक्के* होती, ज्यामुळे असे सूचित होते की एफएचटीसी पूर्णपणे कार्यान्वित नसण्याची शक्यता आहे.

लेखापरीक्षणात असेही आढळून आले की, ***परिच्छेद 4.3*** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, एसडब्ल्युएसएमची माहिती आणि अंमलबजावणी संस्थांद्वारे दिलेली एफएचटीसीची एएपीतील जिल्ह्यांच्या अंतर्गत माहिती व प्रदान केलेल्या जोडण्या जुळत नव्हत्या. त्यामुळे, एफएचटीसी प्रदान करण्याच्या कामगिरीबद्दलच्या माहितीच्या विश्वासार्हतेवर शंका होती.

निर्गमन बैठकीमध्ये, राज्य शासनाने सांगितले (डिसेंबर 2025) की, मंजुरी मिळण्यास विलंब, जमिनीची अनुपलब्धता, स्थानिक वाद आणि हस्तक्षेप, पूर्वीच्या अंदाजामधून वगळलेली वस्ती, स्रोताचे अपयश इत्यादी कारणांमुळे एफएचटीसी साध्य झाले नाही.

### 4.1.1 जेजेएम योजनेअंतर्गत गावे/वस्त्यांचा समावेश न होणे

2024 पर्यंत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला एफएचटीसी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जेजेएम सुरू करण्यात आले होते. जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 3.6.1 नुसार, ग्रामपंचायत किंवा तिच्या उपसमितीने तयार केलेल्या व्हीएपी मध्ये सर्व वस्त्यांमधील सध्या अस्तित्वात असलेल्या एफएचटीसीची संख्या आणि अद्याप उपलब्ध करून द्यावयाच्या एफएचटीसीची संख्या समाविष्ट असायला हवी. जिल्ह्यात उपलब्ध करून द्यावयाच्या एकूण एफएचटीसीची संख्या व्हीएपी एकत्रित करून निश्चित केली जावी.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, राज्यात जेजेएम अंतर्गत एफएचटीसी उपलब्ध करून देण्यासाठीच्या जिल्हा कृती आराखड्यातून 1,08,000 कुटुंबे वगळण्यात आली होती.

ग्रामपंचायत ठराव आणि झेडपीसोबतच्या पत्रव्यवहाराच्या छाननीतून असे दिसून आले की, तीन जिल्ह्यांतील सहा निवडक तालुक्यांमधील आठ[14] गावांमध्ये 2,693 कुटुंबांचे डीएपी अंतर्गत नियोजन केले गेले नव्हते. सहा निवडक[15] जिल्ह्यांपैकी तीन जिल्ह्यांमध्ये[16] एफएचटीसी उपलब्ध करून न दिलेल्या कुटुंबांचा तपशील **तक्ता 6** मध्ये दर्शविला आहे. उर्वरित तीन जिल्ह्यांमध्ये एकही कुटुंब वगळण्यात आले नाही.


---

[14] आंबेगाव, डोणे, कान्होळ, परिवली, तोंडली, तळेगाव माले, वेल्होळी बुद्रुक व वढू खुर्द.

[15] नेवासा, कोपरगाव, भोर, मावळ, भिवंडी आणि शहापूर.

[16] अहिल्यानगर, पुणे आणि ठाणे.

**तक्ता 6: नियोजित, प्रदान केलेली आणि वगळलेली कुटुंबे**




*स्रोत: विभागाने आणि आयएमआयएसने दिलेली माहिती*

पुढे, एसडब्ल्युएसएम ने दिलेल्या माहितीनुसार, ठाणे जिल्ह्यात 201 कुटुंबे एफएचटीसी देण्यापासून वगळण्यात आली होती, तथापि, केवळ दोन निवडक तालुक्याच्या नोंदींच्या चाचणी तपासणीदरम्यान, लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की 2193 कुटुंबे डीएपी अंतर्गत नियोजित नव्हती. त्यामुळे, आकडेवारीतील ही तफावत एसडब्ल्युएसएमद्वारे दूर केली गेली नाही.


निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध संसाधने पुरेशी नव्हती, सर्वेक्षण आणि अंदाज मर्यादित संसाधनांसह केले गेले, त्यामुळे काही वस्त्या वगळल्या गेल्या, त्या सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट केल्या जातील.

वरील वगळलेल्या बाबींवरून हे स्पष्ट होते की, पायाभुत सर्वेक्षण न केल्यामुळे व्हीएपीची अपुरी तयारी झाली.

### 4.1.2. पाणी पुरवठा योजनांची प्रगती

वर्ष 2019-24 दरम्यान, जेजेएमअंतर्गत 51,560 डब्ल्युएसएस हाती घेण्यात आले. 2019-24 दरम्यान राज्यात हाती घेण्यात आलेल्या डब्ल्युएसएसचा वर्षनिहाय तपशील **तक्ता 7** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**तक्ता 7: डब्ल्युएसएसचा तपशील**




*स्रोत: विभागाने दिलेली माहिती*

2019-24 या दरम्यान राज्यात एकूण 51,560 डब्ल्युएसएस सुरू करण्यात आले, त्यापैकी मार्च 2024 पर्यंत 25 *टक्के* (12,703) प्रकल्प पूर्ण झाले होते आणि 75 *टक्के* (38,857) प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर होते. एफएचटीसी मार्फत पाणी पुरवठा करण्यासाठी किंवा पाणी पुरवठा वाढवण्यासाठी डब्ल्युएसएसची आवश्यकता असते. डब्ल्युएसएस पूर्ण होण्याच्या संथ गतीमुळे पाण्याच्या पुरेशा पुरवठ्यावर परिणाम झाला.

2019-24 दरम्यान निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये घरगुती नळजोडणीसाठी डब्ल्युएसएसची प्रगती **तक्ता 9** मध्ये दिली आहे.

**तक्ता 9: झेडपी आणि एमजेपी हाती घेतलेल्या डब्ल्युएसएसची प्रगती**

| जिल्ह्याचे नाव | नियोजित डब्ल्युएसएसची संख्या | | पूर्ण झालेल्या डब्ल्युएसएसची संख्या | | प्रलंबित डब्ल्युएसएसची संख्या | | डब्ल्युएसएस पूर्ण होण्याची *टक्केवारी* | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | झेडपी | एमजेपी | झेडपी | एमजेपी | झेडपी | एमजेपी | झेडपी | एमजेपी |
| अहिल्यानगर | 2099 | 112 | 257 | 04 | 1842 | 108 | 12.24 | 3.57 |
| जळगाव | 1371 | 26 | 164 | 01 | 1207 | 25 | 11.90 | 3.8 |
| कोल्हापूर | 1270 | 15 | 416 | 01 | 854 | 14 | 32.75 | 6.67 |
| पुणे | 1239 | 168 | 150 | 05 | 1089 | 163 | 12.10 | 2.97 |
| ठाणे | 720 | 22 | 137 | 01 | 583 | 21 | 19.03 | 4.54 |
| सोलापूर | 1840 | 23 | 339 | 01 | 1501 | 22 | 18.79 | 4.34 |
| **एकूण** | **8539** | **366** | **1463** | **13** | **7076** | **353** | **17.13** | **3.55** |

*स्रोत: जिल्ह्यांच्या झेडपी/एमजेपी यांनी दिलेली माहिती*

वर दिसत असल्याप्रमाणे:

1. झेडपींनी नियोजित केलेल्या 8,539 डब्ल्युएसएसपैकी आणि एमजेपीने नियोजित केलेल्या 366 डब्ल्युएसएसपैकी, झेडपींनी केवळ 1,463 (17.13 *टक्के*) आणि एमजेपीने केवळ 13 (3.55 *टक्के*) प्रकल्प पूर्ण केले. ही केवळ निकृष्ट कामगिरीच नाही तर ग्रामीण (झेडपी) आणि प्रादेशिक / मोठ्या प्रमाणावरील (एमजेपी) या दोन्ही अंमलबजावणी संस्थांमध्ये असलेल्या यंत्रणेमधील अंमलबजावणीतील त्रुटी दर्शवते.

2. सर्व जिल्ह्यांमध्ये सातत्याने कामगिरी खराब दिसून आली, कारण झेडपींमार्फत डब्ल्युएसएस पूर्ण करण्याचे प्रमाण 11.90 *टक्के* (जळगाव) ते 32.75 *टक्के* (कोल्हापूर) पर्यंत होते. एमजेपीच्या बाबतीत, डब्ल्युएसएस पूर्ण करण्याचे प्रमाण 2.97 *टक्के* (पुणे) ते 6.67 *टक्के* (कोल्हापूर) पर्यंत होते. कोणताही जिल्हा साधारण कामगिरीसुद्धा दर्शवत नाही. यामुळे स्थानिक समस्यांची कारणे नाकारली जावुन आणि नियोजन व अंमलबजावणीमधील राज्यस्तरीय यंत्रणेतील कमकुवतपणाला पुष्टी मिळते.

3. अहिल्यानगरमध्ये, नियोजित 112 डब्ल्युएसएसपैकी चार पूर्ण झाल्या (3.57 *टक्के*). पुण्यात, नियोजित 168 डब्ल्युएसएसपैकी पाच पूर्ण झाल्या (2.97 *टक्के*). सोलापूरमध्ये, नियोजित 23 डब्ल्युएसएसपैकी केवळ एक पूर्ण झाली (4.34 *टक्के*). एमजेपी सामान्यतः मोठ्या प्रमाणावरील पाणी पुरवठा योजना आणि बहु-ग्राम योजना हाताळतात. पूर्णत्वाचा अत्यंत कमी दर हा एक धोरणात्मक धोका आहे, कारण येथील विलंब मोठ्या प्रमाणावरील पुरवठ्यावर अवलंबून असलेल्या बहु-ग्राम योजनांमध्ये पसरतो.

4. झेडपीतील 7,076 आणि एमजेपीतील 353 डब्ल्युएसएसची उच्च प्रलंबितता, पुरेशा क्षमतेशिवाय अंमलबजावणी प्रक्रियेवर अतिरिक्त भार असल्याचे, किंवा तयारीची (जमीन, सविस्तर प्रकल्प अहवाल, मंजुऱ्या, जलस्रोत) खात्री न करता योजनांना मंजुरी दिल्याचे सूचित करते.

5. कोल्हापूर झेडपी आणि एमजेपी डब्ल्युएसएसचे पूर्णत्व अनुक्रमे 32.75 *टक्के* आणि 6.67 *टक्के* होते. निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी, कोल्हापूरने सर्वाधिक *टक्के*वारीची पूर्तता केली आहे, तथापि, झेडपी स्तरावर एक-तृतीयांश पूर्तता झाली असून एमजेपी स्तरावर ती नगण्य आहे. यावरून सध्याच्या प्रणालीच्या क्षमतेची कमाल मर्यादा कमी असल्याचे दिसून येते.

सर्व तपासलेल्या जिल्ह्यांमध्ये झेडपी आणि एमजेपी या दोन्हींकडून डब्ल्युएसएसची कमी पूर्तता होणे, हे अंमलबजावणीतील गंभीर अडचणी दर्शवते आणि नियोजन व अंमलबजावणीयोग्य क्षमता यांच्यातील तफावतीकडे लक्ष वेधते, ज्यामुळे जेजेएमची उद्दिष्ट्ये वेळेवर साध्य करण्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि सांगितले की वन, रेल्वे, राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून मंजुरी मिळण्यास होणारा विलंब, स्थानिक वाद/हस्तक्षेप, स्रोतातील बिघाड आणि पाईपच्या पुरवठ्याची कमतरता इत्यादी कारणांमुळे प्रगतीला अडथळा निर्माण झाला.

### 4.1.3 पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीतील विलंब

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये, डब्ल्युएसएस पूर्ण होण्यास झालेला विलंब हा प्रामुख्याने कामाच्या सुरुवातीस झालेला विलंब, संबंधित ग्रामपंचायतीकडून डब्ल्युएसएसच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक जमिनीची अनुपलब्धता, वन विभागाकडून वनजमिनीची मंजुरी न मिळणे, विविध प्राधिकरणांकडून एनओसी मिळण्यास होणारा विलंब इत्यादी कारणांमुळे होता. काही निवडक प्रकरणे खाली दिली आहेत.

#### अ) जमीन उपलब्ध नसल्यामुळे होणारा विलंब

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 3.6.1 मध्ये असे नमूद केले आहे की, ग्रामपंचायतीने तयार केलेल्या व्हीएपी मध्ये गावांतर्गत पाणी पुरवठा पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी ग्रामपंचायतीच्या नावे जमिनीची उपलब्धता सुनिश्चित केली जाईल. पुढे, गावांतर्गत पाणी पुरवठा कामांसाठी, मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 6.2 मध्ये असे नमूद केले आहे की, जमीन ग्रामपंचायतीने उपलब्ध करून द्यायची आहे आणि जमीन उपलब्ध नसल्यास, राज्य शासन जमीन उपलब्ध करून देईल/व्यवस्था करेल.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, अंमलबजावणी संस्थांनी अंदाजपत्रक तयार करताना मोकळ्या जागांची उपलब्धता सुनिश्चित केली नाही आणि जमिनीचा ताबा न घेताच कार्यारंभ आदेश निर्गमित केले, ज्यामुळे डब्ल्युएसएसचे काम एकतर रखडले किंवा कामाच्या पूर्ततेस विलंब झाला.

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये, लेखापरीक्षणात असे आढळून आले की सात डब्ल्युएसएसच्या अंमलबजावणीत सहा ते 27 महिन्यांचा अवाजवी विलंब झाला

आहे, जिथे ***परिशिष्ट V*** मध्ये दर्शविल्याप्रमाणे डब्ल्युएसएसचे विविध घटक कार्यान्वित झाले नव्हते.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने हे मान्य केले की विविध विभागांकडून (वन/रेल्वे/एनएचएआय/पीडब्ल्युडी) मंजुरी मिळण्यास होणारा विलंब, जमिनीची अनुपलब्धता, स्थानिक वाद, सुटलेल्या वस्त्या, ऊर्जा स्रोतांचे अपयश, पाईप्सची कमतरता इत्यादी विविध कारणांमुळे प्रगतीला अडथळा येत आहे.

हे उत्तर स्वीकार्य नाही, कारण अंमलबजावणी संस्थांनी योजना हाती घेण्यापूर्वी जमीन आणि सर्व आवश्यक परवानग्या मिळवल्या गेल्या आहेत याची खात्री करायला हवी होती.

**ब) कामाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेला विलंब**

कार्य.अभि. झेडपी अहिल्यानगर यांच्या अंतर्गत बावी एसव्हीएस प्रकल्पाचे ₹ 0.61 कोटी अंदाजित रकमेचे याचे काम ऑगस्ट 2022 मध्ये सुरू झाले. या प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश ऑगस्ट 2022 मध्ये निर्गमित करण्यात आले होते आणि ते काम ऑगस्ट 2023 पर्यंत पूर्ण करायचे होते. कंत्राटदाराने ₹ 0.09 कोटींचे काम पूर्ण केले (सप्टेंबर 2024).

सुरुवातीच्या एफएचटीसी प्रस्तावातून वगळण्यात आलेल्या नऊ भागांतील रहिवाशांचा समावेश करण्यासाठी ग्रामपंचायतीने (जुलै 2023) एक ठराव मंजूर केला. पुढे, ग्रामपंचायतीने असा ठराव केला की, पाण्याचा स्रोत असलेले बावी तळे पाण्याची गरज भागवत नाही, त्यामुळे तो बदलून पाण्याचा स्रोत धोंडपरगाव तळ्यातील नवीन विहिरीत करावा. त्यानुसार, ₹ 1.51 कोटींचे सुधारित अंदाजपत्रकाला तांत्रिक मंजूरी (फेब्रुवारी 2024) आणि प्रशासकीय मान्यता (नोव्हेंबर 2024) प्राप्त करण्यात आली.

नोव्हेंबर 2025 पर्यंत, 74 *टक्के* काम पूर्ण झाले होते आणि ₹ 0.45 कोटी खर्च झाला होता. त्यामुळे, कामाच्या व्याप्तीमध्ये बदल झाल्याने आणि रहिवाशांचे योग्य सर्वेक्षण न करता अंदाजपत्रक तयार केल्यामुळे कामाच्या पूर्ततेस विलंब झाला, परिणामी लाभार्थ्यांना तीन वर्षांसाठी नियमित पाणीपुरवठ्याच्या लाभापासून वंचित राहावे लागले.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, अतिरिक्त लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मंजूर योजनेचा स्रोत अपुरा असल्याने मूळ योजनेची व्याप्ती बदलण्यात आली.

यावरून हे सिद्ध होते की, ***परिच्छेद 2.1*** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे गाव, जिल्हा आणि राज्य स्तरावर कृती आराखडा तयार करण्यात त्रुटी होत्या आणि अयोग्य नियोजनामुळे डब्ल्युएसएस पूर्ण होण्यास विलंब झाला.

**क) पूर्वनिर्मित पॅकेज प्रकारच्या डब्ल्युटीपीचे अपूर्ण काम**

मुख्य अभियंता, एमजेपी, नाशिक प्रादेशिक विभाग यांनी (जून 2023) जळगाव मंडळातील काम सुरु असलेल्या 33 जलशुद्धीकरण प्रकल्पाचे (डब्ल्युटीपी) मध्ये पारंपारिक सरलीकृत डब्ल्युटीपी ऐवजी पूर्वनिर्मित पॅकेज प्रकारच्या डब्ल्युटीपी वापरास मंजुरी दिली होती. बांधकामासाठी लागणारा वेळ वाचवण्यासाठी आणि कुशल कामगारांची समस्या दूर करण्यासाठी ही मंजुरी देण्यात आली होती, जेणेकरून हे डब्ल्युटीपी मार्च 2024 पूर्वी पूर्ण करता येतील. त्यानुसार, सर्व 33 डब्ल्युटीपीमध्ये पूर्वनिर्मित डब्ल्युटीपी एक अतिरिक्त बाब म्हणून मंजूर करण्यात आली होती.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, जळगाव जिल्ह्यातील चार चाचणी-तपासणी केलेल्या डब्ल्युएसएस[17] मध्ये ₹ 4.70 कोटींच्या पूर्वनिर्मित डब्ल्युटीपीची अतिरिक्त बाब मंजूर करण्यात आली होती. हे डब्ल्युएसएस मे 2024 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, नोव्हेंबर 2025 पर्यंत ना डब्ल्युएसएस, ना ही पूर्वनिर्मित डब्ल्युटीपीचे काम पूर्ण झाले. त्यामुळे, पूर्वनिर्मित डब्ल्युटीपी खरेदी करण्यामागील मूळ उद्देश पूर्ण झाला नाही.

निर्गमन बैठकीमध्ये शासनाने (डिसेंबर 2025) सांगितले की भविष्यात असे विलंब टाळण्याचे निर्देश अंमलबजावणी संस्थांना दिले जातील.

## 4.2 पाणीपुरवठ्याची पर्याप्तता

जेजेएमचे उद्दिष्ट दररोज किमान 55 लिटर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे हे होते. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरण 12 मध्ये अशी तरतूद आहे की, प्रत्येक घराला मिळणाऱ्या एफएचटीसीचे मूल्यांकन घरगुती मीटरद्वारे केले जाऊ शकते. पुढे, मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 2.3 मध्ये 14व्या वित्त आयोगाच्या (2015-2020) शिफारसी मांडण्यात आल्या आहेत, ज्यात अशी शिफारस आहे की राज्यांनी घरांना दिल्या जाणाऱ्या वैयक्तिक पिण्याच्या पाण्याच्या जोडण्यांचे 100 *टक्के* मीटरिंग करण्याच्या दिशेने टप्प्याटप्प्याने वाटचाल करावी. शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व विद्यमान वैयक्तिक जोडण्यांना मार्च 2017 पर्यंत मीटर बसवले जावे. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांनी पाणी/महसुलाचे सतत होणारे

---

[17] दहिवड व चार गाव, पिंपळगाव तालुका पाचोरा, वधोडा व आठ गाव, शिरसोली तालुका जळगाव.

नुकसान थांबवण्यासाठी, मीटर नसलेल्या जोडण्यांवर कारवाई करण्याचा अधिकार एसडब्ल्युएसएमला दिला होता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, जेजेएम अंतर्गत नळजोडण्यांना मीटर बसवण्याचे नियोजन एसडब्ल्युएसएमने केले नव्हते, उलट, त्यांनी योजनांच्या अंदाजामध्ये मीटरिंगची तरतूद समाविष्ट न करण्याचे निर्देश दिले (फेब्रुवारी 2021), जे जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या विरुद्ध होते. त्यामुळे पुरवठा केलेल्या पाण्याचे प्रमाण मोजण्याची कोणतीही यंत्रणा नव्हती, म्हणून लेखापरीक्षणातून पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याची पर्याप्तता निश्चित करता आली नाही.

एसडब्ल्युएसएमने (नोव्हेंबर 2024) असे नमूद केले की, 14व्या आणि 15व्या वित्त आयोगाअंतर्गत सर्व घरगुती नळजोडण्यांवर पाणी मीटर बसवण्याचे काम करण्यासाठी निधी अपुरा असल्याने, योजनांच्या अंदाजात मीटरच्या तरतुदींचा समावेश न करण्याचे निर्देश निर्गमित करण्यात आले होते.

हे उत्तर स्वीकार्य नाही, कारण पाणी मीटरद्वारे किमान 55 एलपीसीडी पाणी पुरवठा सुनिश्चित केला जाऊ शकतो.

## 4.3 एसडब्ल्युएसएम आणि जिल्ह्यांनी दिलेल्या एफएचटीसीच्या माहितीमधील तफावत

जेजेएम डॅशबोर्डनुसार, मार्च 2024 पर्यंत 1.46 कोटी कुटुंबांपैकी 1.25 कोटी कुटुंबांना एफएचटीसी प्रदान करण्यात आले आहे. तथापि, लेखापरीक्षणामध्ये 2019 ते 2024 या वर्षांसाठी, एएपी नुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसी आणि जेजेएम अंतर्गत प्रदान केलेल्या जोडणीसंदर्भात, एसडब्ल्युएसएम आणि सहा निवडक जिल्ह्यांनी दिलेल्या माहितीमध्ये तफावत आढळून आली. एसडब्ल्युएसएम आणि जिल्हा स्तरावरील अंमलबजावणी संस्थांनी दिलेली एफएचटीसीचा माहिती जुळत नव्हती. निवडक जिल्ह्यांमध्ये नियोजित आणि प्रदान केलेल्या एफएचटीसीची माहितीची, एसडब्ल्युएसएमने 2019-24 साठी दिलेल्या माहितीशी केलेली तुलना **तक्ता 10** मध्ये दर्शविली आहे:

**तक्ता 10: जिल्हा स्तरावर एसडब्ल्युएसएम आणि अंमलबजावणी संस्थानुसार नियोजित आणि प्रदान केलेले एफएचटीसी**

| जिल्हा | एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती | | निवडलेल्या जिल्ह्याने (अंमलबजावणी संस्था) दिलेली माहिती | | फरक/ न जुळणारा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | जोडणी पुरवलेली घरे | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | जोडणी पुरवलेली घरे | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | जोडणी पुरवलेली घरे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 2 आणि 4 चा फरक | 3 आणि 5 चा फरक |
| अहिल्यानगर | 563526 | 316736 | 255548 | 126264 | 307978 | 190472 |
| जळगाव | 262172 | 199614 | 298497 | 298497 | 36325 | 98883 |
| कोल्हापूर | 343310 | 280240 | 1351441 | 637077 | 1008131 | 356837 |
| पुणे | 761335 | 146909 | 541295 | 427817 | 220040 | 280908 |
| सोलापूर | 383356 | 183715 | 376819 | 371658 | 6537 | 187943 |
| ठाणे | 400828 | 74999 | 71521 | 2356 | 329307 | 72643 |
| **एकूण** | **2714527** | **1202213** | **2895121** | **1863669** | **180594** | **661456** |

*स्रोत: विभागाने दिलेली माहिती*

एसडब्ल्युएसएम ने दिलेल्या माहितीनुसार, निवडक सहा जिल्ह्यांमध्ये नियोजित 27,14,527 एफएचटीसीपैकी 12,02,213 एफएचटीसी पुरवण्यात आले. तथापि, निवडक जिल्ह्यांच्या अंमलबजावणी संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, 28,95,121 च्या नियोजित एफएचटीसीच्या तुलनेत 18,63,669 एफएचटीसी पुरवण्यात आले. एफएचटीसीचा वर्षनिहाय आणि जिल्हानिहाय तपशील ***परिशिष्ट VI*** मध्ये दिलेला आहे.

एसडब्ल्युएसएम आणि जिल्हा स्तरावरील माहितीतील तफावतीमुळे, जेजेएम अंतर्गत कामगिरीचे संख्यात्मक मापन करण्यासाठी वास्तविक एफएचटीसीचे लक्ष्य आणि साध्यता निश्चित करता आली नाही.

**तक्ता** 10 च्या विश्लेषणातून असे दिसून येते:

1. राज्य आणि जिल्हा माहितीमधील तफावत:
    - एसडब्ल्युएसएम ने अहवाल दिला की आवश्यक एफएचटीसी 27,14,527 होते, तर निवडलेल्या जिल्ह्यांनी 28,95,121 एफएचटीसी आवश्यक असल्याचे कळवले, ज्यामुळे 1,80,594 जोडणीची तफावत दिसून येते.
    - एसडब्ल्युएसएम ने अहवाल दिला की प्रदान केलेले एफएचटीसी 12,02,213 होते, तर निवडलेल्या जिल्ह्यांनी 18,63,669 एफएचटीसी प्रदान केल्याचे कळवले, त्यामुळे 6,61,456 जोडणीची तफावत आहे.

हा किरकोळ फरक नसुन एसडब्ल्युएसएम आणि क्षेत्रीय स्तरावरील नोंदींमधील माहितीची कमतरता आणि अहवाल नियंत्रणातील गंभीर समस्या ही आकडेवारी दर्शवते.

2. जिल्हावार विसंगती अत्यंत तीव्र आहेत आणि कोल्हापूरच्या बाबतीत खाली चर्चा केल्याप्रमाणे वेळेतील फरकाने त्यांचे स्पष्टीकरण देता येत नाही:

- एसडब्ल्युएसएमनुसार, 3,43,310 एफएचटीसीची आवश्यकता होती, तथापि जिल्ह्याने 13,51,441 एफएचटीसीची आवश्यकता असल्याचे कळवले, ज्यामुळे 10,08,131 जोडण्यांचा फरक दिसून येतो.
- एसडब्ल्युएसएमने 2,80,240 एफएचटीसी पुरवल्याचे कळवले, तर जिल्ह्याने 6,37,077 एफएचटीसी पुरवल्याचे कळवले, ज्यामुळे 3,56,837 जोडण्यांचा फरक दिसून येतो.

एवढ्या मोठ्या प्रमाणातील तफावतीचे कारण किरकोळ माहिती विलंब, अद्ययावतीकरण चक्र किंवा लिपिकीय त्रुटी असू शकत नाही. विसंगत माहिती दर्शवते की ही समस्या एक-वेळच्या स्थलांतराची नसून, माहिती प्रवाहावरील ताळमेळ, प्रमाणीकरण आणि नियंत्रणाचा संरचनात्मक अभाव आहे. आवश्यक असलेल्या जोडण्यांची संख्या आणि पुरवल्याप्रमाणे नोंदवलेल्या जोडण्यांची संख्या या दोन्हीमधील मोठी तफावत माहिती प्रमाणीकरण आणि ताळमेळ यंत्रणेतील कमतरता दर्शवते, ज्यामुळे अभियाना अंतर्गत प्रगती निरीक्षण आणि नियोजनाच्या विश्वासार्हतेला बाधा येते.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, 2022 पासून आयएमआयएस वरील एफएचटीसी माहिती अद्ययावतीकरण बंद होते, त्यामुळे आयएमआयएस वरील माहिती जिल्ह्यांनी सादर केलेल्या माहितीशी जुळत नव्हती.

नियमित अद्ययावतीकरणाअभावी, आयएमआयएस वर उपलब्ध असलेल्या माहितीवर विश्वास ठेवता येणार नाही.

## 4.4 हर घर जल गावाचे चुकीचे प्रमाणीकरण

जेजेएम 2024 पर्यंत 'हर घर जल' (एचजीजे) साध्य करण्याच्या उद्दिष्टाने सुरू करण्यात आले. जेजेएम अंतर्गत येणाऱ्या आणि पूर्ण एफएचटीसी मिळालेल्या गावांना 'हर घर जल' गाव म्हणून घोषित केले जाणार आहे. शासनाने मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली (ऑक्टोबर 2021) आणि अंमलबजावणी संस्थांना निर्देश दिले की, जेजेएम अंतर्गत पूर्ण एफएचटीसी दिल्यानंतर ग्रामपंचायतीला एचजीजे प्रमाणपत्र निर्गमित करावे. एचजीजे ची स्थिती **तक्ता 11** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 11: महाराष्ट्रातील हर घर जल प्रमाणपत्राची स्थिती**

| पातळी | एकूण संख्या | एचजीजे म्हणून प्रमाणित |
|---|---|---|
| तालुका | **351** | **2** |
| गावे | **40297** | **10677** |

*स्रोत: आयएमआयएस - जे8 मध्ये दर्शविलेली माहिती (दिनांक 01.04.24 रोजीची)*

**तक्ता 12** मध्ये दाखवल्याप्रमाणे, निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये, 70 तालुके आणि 8005 गावांपैकी, एकही तालुका नाही परंतु 2185 गावे एचजीजे म्हणून घोषित करण्यात आली.

**तक्ता 12: निवडक जिल्हयांमधील हर घर जल प्रमाणपत्राची स्थिती**

| जिल्हयांची नावे | तालुके | | गावे | |
|---|---|---|---|---|
| | तालुक्यांची संख्या | एचजीजे म्हणून प्रमाणित केलेल्या तालुक्यांची संख्या | गावांची संख्या | एचजीजे म्हणून प्रमाणित गावांची संख्या |
| अहिल्यानगर | 14 | निरंक | 1575 | 296 |
| जळगाव | 15 | निरंक | 1487 | 631 |
| कोल्हापूर | 12 | निरंक | 1191 | 578 |
| पुणे | 13 | निरंक | 1833 | 91 |
| सोलापूर | 11 | निरंक | 1128 | 441 |
| ठाणे | 5 | निरंक | 791 | 148 |
| **एकूण** | **70** | **निरंक** | **8005** | **2185** |


*स्रोत: जे8 मध्ये दर्शविलेली आयएमआयएस-माहिती (दिनांक 01.04.24 रोजीची)*

लेखापरीक्षण चाचणीमध्ये निवडक जिल्ह्यांमधील एचजीजेची स्थिती तपासण्यात आली आणि असे आढळून आले की प्रत्येक घराला पाणी पुरवठा झाला नसतानाही गावांना एचजीजे गाव म्हणून घोषित करण्यात आले होते.

- 12 ऑगस्ट 2022 ते 22 ऑगस्ट 2023 या कालावधीत अहिल्यानगरमधील सहा तालुक्यांमधील[18] 24 गावांना एचजीजे गावे म्हणून प्रमाणित करण्यात आले असताना सुद्धा या गावांना फेब्रुवारी 2024 ते जुलै 2024 या कालावधीत टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागला.

एचजीजे प्रमाणपत्राची प्रत **छायाचित्र 4** मध्ये दाखवली आहे.

18 अहिल्यानगर, जामखेड, कर्जत, नेवासा, पारनेर आणि पाथर्डी.



शासन परिपत्रक क्रमांक: जजीमि २०२१/प्र.क्र.१७८/ पापु १०

शासन परिपत्रक जजीमि २०२१/ प्र.क्र.१७८/ पापु १० सोबतचे
परिशिष्ट-३

Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

हर घर जल

कार्यात्मक घरगुती नळ जोडणी सर्व कुटुंबांना प्रदान केल्याचे प्रमाणपत्र

मी.............सरपंच/ अध्यक्ष, ग्राम पाणी व स्वच्छता समिती............. ग्रामपंचायत.............जिल्हा.............महाराष्ट्र राज्य आणि मी .............ग्रामसेवक प्रमाणित करतो की, गावातील १०० टक्के कुटुंबांना कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. हा प्रस्ताव आज दि. .............रोजी ग्रामसभेमध्ये पारीत करण्यात येत आहे.

ग्रामसेवक ग्रामसेवक
(नाव ग्रामपंचायत,एकनाथवाडी
ग्राम ता.पाथर्डी,जि.अहमदनगर
तालुका............
जिल्हा............

सरपंच/ अध्यक्ष ग्राम पाणी व स्वच्छता समिती
(नाव व शिक्का ग्रामपंचायत,एकनाथवाडी
ग्रामपंचायत... ता.पाथर्डी.जि.अहमदनगर
तालुका..............................
जिल्हा ..................................

***छायाचित्र 4: टँकरवर अवलंबून असलेल्या गावातील ग्रामपंचायतीने (अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यामधील एकनाथवाडी) निर्गमित केलेले एचजीजे प्रमाणपत्र.***

- अहील्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्याच्या पुनतगाव येथील अंगणवाडी केंद्रामध्ये एफएचटीसी पुरवण्यात आले नव्हते. तसेच, लाभार्थी सर्वेक्षणासाठी (ऑक्टोबर 2024) केलेल्या भेटीदरम्यान, लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की, जुलै 2023 मध्ये गावाला एचजीजे गाव म्हणून प्रमाणित करण्यात आले असूनही, एक कुटुंब जेजेएम अंतर्गत समाविष्ट नव्हते.

- एचजीजे अनुरूप म्हणून प्रमाणित केलेल्या 643 गावांपैकी, जळगाव जिल्ह्यातील पाच तालुक्यांमधील 14 गावांना ऑगस्ट 2022 ते ऑगस्ट 2023 या कालावधीत एचजीजे गावे म्हणून प्रमाणित करण्यात आले होते. तथापि, लेखापरीक्षणात असे आढळून आले की मार्च 2024 ते जून 2024 या कालावधीत या गावांना पाण्याच्या टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता.

- जळगाव जिल्ह्यातील बोदवड तालुक्यामधील पळसखेडे खुर्द गावाला मे 2023 मध्ये एचजीजे गाव म्हणून प्रमाणित करण्यात आले. तथापि, लाभार्थी सर्वेक्षणादरम्यान असे आढळून आले की, 24 पैकी एकाही कुटुंबाला एफएचटीसी देण्यात आले नव्हते. उपविभागीय अभियंत्यांनी (ऑक्टोबर 2024) उत्तर दिले की, गावकऱ्यांनी पाणीजोडणी घेण्यास नकार दिला आणि सध्याच्या स्टँड पोस्टवरूनच पाणी घेण्याचा आग्रह धरला. त्यांनी पुढे असेही सांगितले की, या कुटुंबांना एफएचटीसी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. (ऑक्टोबर 2024).

- ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यामधील तीन[19] गावांना एचजीजे गाव म्हणून प्रमाणित करण्यात आले, जरी 1671 अंदाजित एफएचटीसीपैकी 237 कुटुंबांना एफएचटीसी मिळणे बाकी होते.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की एचजीजे गावाला प्रमाणित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याबाबत अंमलबजावणी संस्थांना सूचना निर्गमित केल्या जातील.

## 4.5 पाणी पुरवठा योजनेच्या मालमत्तेचे जिओ-टॅगिंग

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 11.1.3 नुसार, पारदर्शकता आणण्यासाठी आणि देखरेखीसाठी राज्यांना डब्ल्युएसएसच्या सर्व मालमत्तांना जिओ-टॅग करणे आवश्यक होते. धुण्याची आणि आंघोळीची ठिकाणे, सांडपाणी संकलन आणि प्रक्रिया प्रकल्प, स्रोत शाश्वतता संरचना इत्यादींसह प्रत्येक पायाभूत मालमत्तेला, मग ती नवीन असो वा जुनी, जिओ-टॅग करणे आवश्यक होते.

जेजेएम आयएमआयएस (एफयुए-3)[20] नुसार, राज्यातील एकूण 59234 जलस्रोतांपैकी 57568 (डिसेंबर 2024) जलस्रोतांना जिओ-टॅग करण्यात आले होते, तर जेजेएम, आयएमआयएसच्या दुसऱ्या अहवालात (एफयुए-5) नोंदवलेल्या जिओ-टॅग केलेल्या जलस्रोतांची संख्या 79889 होती. पुढे, आयएमआयएसच्या अहवालातील (एफयुए-3) निवडक जिल्ह्यांमधील अकरा गावांमध्ये[21] जिओ-टॅगिंगच्या 23 उलट तपासणी केलेल्या प्रकरणांमध्ये, लेखापरीक्षणात असे आढळून आले की, एकाच जलस्रोतांना दोन किंवा तीन वेळा जिओ-टॅग करण्यात आले, ज्यामुळे जिओ-टॅगिंगची कामगिरी फुगवून दाखवण्यात आली. खालील **छायाचित्र 5** आणि **6** मध्ये पाहिल्याप्रमाणे, अहिल्यानगरमधील कोपरगाव तालुक्याच्या तळेगाव माले गावातील एकाच पाण्याच्या स्रोताला वेगवेगळ्या आयडी असलेल्या दोन योजनांसाठी जिओ टॅग केले गेले होते.

---

[19] डुंगे, पिंपळाघर आणि पिंपळस (भिवंडी).

[20] फील्ड वापरकर्ता अनुप्रयोग (एफयूए-3 आणि 5).

[21] नेवासा गटातील शिंगवे तुकाई व पुनतगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव गटातील तळेगाव माले; ठाण्यातील शहापूर गटातील वेल्होळी बुद्रुक, आणि कुकंभे; जळगावच्या बोदवड गटातील वरखेडे खुर्द; पुण्यातील दौंड गटातील सांगावडे; दक्षिण सोलापूरमधील आचेगाव आणि सोलापूरमधील सांगोला गटातील डिकसाळ आणि कागल गटातील अर्जुनी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले गटातील चोकाक.

|  |  |
|---|---|
| **छायाचित्र 5: स्किम आयडी 20008952 तळेगाव माळे** | **छायाचित्र 6: स्किम आयडी 20123583 तळेगाव माळे-FHTC-घटक** |


*स्रोत:- जेजेएम डॅशबोर्डवर उपलब्ध असलेले फोटो 5 आणि 6, ज्यात एकाच पाण्याच्या स्रोतांना दोनदा जिओ टॅग केलेले दाखवले आहे.*

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, आयएमआयएस आणि डब्ल्युक्युएमआयएस वरील डेटा सिंक्रोनायझेशनच्या समस्यांमुळे जिओ-टॅगिंगची पुनरावृत्ती झाली होती. जिल्हा स्तरावरील अंमलबजावणी संस्थांना स्रोत आणि इतर मालमत्तांचे दुहेरी जिओ-टॅगिंग काढून टाकण्याचे निर्देश देण्यात आले आणि माहिती अद्यावत करण्यासाठी आवश्यक टॅब पुन्हा उघडण्यासाठी एनजेजेएम कडे विनंती पाठवण्यात आली आहे.

### 4.6 जल जीवन अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या विरुद्ध दिलेल्या सूचनांमुळे कुंपणाचा मुद्दा डीपीआरमधून वगळणे

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 6.1 नुसार, गावांतर्गत पाणी पुरवठा पायाभूत सुविधांसाठी, म्हणजेच ईएसआर/ पाण्याची टाकी, पंप ऑपरेटर कक्ष, सामुदायिक जलशुद्धीकरण प्रकल्प इत्यादींसाठी हिरव्या कुंपणाची जागा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. तथापि, एसडब्ल्युएसएमने (फेब्रुवारी 2021) डब्ल्युएसएसच्या अंदाजपत्रकात चेन लिंक कुंपण आणि कंपाऊंड भिंतीच्या कामांचा समावेश न करण्याची सूचना निर्गमित केली.

तीन गावांमध्ये[22] डब्ल्युएसएसच्या छाननीदरम्यान लेखापरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले की ईएसआरसाठी कुंपण/ कंपाऊंड भिंत बांधण्यात आली नव्हती. निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की प्रति व्यक्ती/प्रति एफएचटीसी खर्चाचे निकष पूर्ण करण्यासाठी कुंपणाच्या बाबीचा विचार केला गेला नाही.




**छायाचित्र 7: पुनतगाव, तालुका नेवासा येथील कुंपण नसलेला ईएसआर**

हे उत्तर स्वीकार्य नाही कारण एसडब्ल्युएसएमची सूचना जेजेएमच्या मार्गदर्शक तत्वांनुसार नव्हती आणि त्यामुळे जेजेएम अंतर्गत मालमत्तेच्या सुरक्षेलाही बाधा आली.

## 4.7 निविदा प्रक्रिया

पीडब्ल्युडी जीआर सप्टेंबर 2018 नुसार प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर, निविदा प्रसिद्ध करणे, निविदापूर्व बैठक, तांत्रिक निविदा आणि आर्थिक निविदा इत्यादींसह विविध निविदा प्रक्रियांची अंतिम रूपरेषा तयार करणे आवश्यक आहे. डब्ल्युएसएसडी, एसडब्ल्युएसएम आणि एमजेपी यांनी निविदा प्रक्रियेच्या विविध टप्प्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी विविध सूचना/परिपत्रके निर्गमित केली. या सहा नमुना जिल्ह्यांमध्ये लेखापरीक्षण चाचणीद्वारे निविदा प्रक्रियेची तपासणी करण्यात आली आणि लेखापरीक्षणात आढळलेली निरीक्षणे खाली तपशीलवार दिली आहेत.

### 4.7.1 एसएलएसएससीच्या पूर्वपरवानगीशिवाय डब्ल्युएसएसचा कार्यारंभ आदेश निर्गमित करणे

भारत सरकार, राष्ट्रीय जल जीवन अभियानाच्या सुधारित (जून 2022) मार्गदर्शक तत्वांनुसार, मंजूर किंमतीपेक्षा[23] जास्त होणारा कोणताही खर्च संबंधित राज्याला सोसावा लागेल आणि जेजेएम अंतर्गत उपलब्ध संसाधनांमधून

22 शिंगवे तुकाई आणि अहिल्यानगरमधील पुनतगाव आणि ठाणे जिल्ह्यातील डोहाळे.

23 प्रचलित नियमांनुसार खुल्या, पारदर्शक आणि स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेला खर्च. अशा मंजूर खर्चाच्या मर्यादेपर्यंत जेजेएम अंतर्गत उपलब्ध संसाधनांचा वापर केला जाऊ शकतो.

कोणताही अतिरिक्त खर्च करण्यास परवानगी दिली जाणार नाही.डब्ल्युएसएसच्या बाबतीत, जर मंजूर खर्च निविदेतील किंमतीपेक्षा 10 ते 25 टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर काम देण्यापूर्वी एसएलएसएससीची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते आणि जर मंजूर खर्च निविदेतील किंमतीपेक्षा 25 टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर एसडब्ल्युएसएमच्या सर्वोच्च समितीची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, निवडक सहा जिल्ह्यांमधील 479 योजनांमध्ये, जिथे मंजूर खर्च निविदेतील किंमतीपेक्षा 10 ते 25 *टक्के* जास्त होता, तिथे अंमलबजावणी संस्थांनी डब्ल्युएसएसचे कार्यारंभ आदेश एसएलएसएससीच्या पूर्वपरवानगीशिवाय निर्गमित केले, जे अनियमित होते. तपशील **तक्ता 13** मध्ये आहे.

**तक्ता 13: जिल्हावार योजना, ज्यात मान्य निविदा किंमत मंजूर किंमतीपेक्षा जास्त होती**

| **जिल्ह्याचे नाव** | **अशा योजनांची संख्या, ज्यामध्ये मंजूर खर्च निविदा खर्चापेक्षा 10 ते 25 *टक्क्यांनी* जास्त होता.** | **एकूण मंजूर किंमत / निविदा किंमत (रुपये लाखांमध्ये)** | **एकूण मान्य निविदा किंमत (रुपये लाखांमध्ये)** |
|---|---|---|---|
| अहिल्यानगर | 81 | 53315.76 | 60070.50 |
| जळगाव | 47 | 4914.82 | 5511.57 |
| कोल्हापूर | 254 | 28362.61 | 32433.27 |
| पुणे | 80 | 66930.94 | 79148.94 |
| सोलापूर | 16 | 4598.48 | 5297.80 |
| ठाणे | 1 | 2059.04 | 2380.25 |
| **एकूण** | **479** | **160181.65** | **184842.33** |

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की सर्व योजना हाती घेण्यापूर्वी एसएलएसएससीकडून मंजूर करण्यात आल्या होत्या. डब्ल्युएसएसच्या बाबतीत, जर मंजूर खर्च 10 ते 25 टक्क्यांपेक्षा जास्त आणि 25 टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर प्रस्ताव अनुक्रमे एसएलएसएससी आणि सर्वोच्च समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते.

तथापि, वस्तुस्थिती हि होती की उपरोक्त प्रकरणांमध्ये कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यापूर्वी पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती.

### 4.7.2 कंत्राटदारांच्या बोली क्षमतेचे मूल्यांकन

डब्ल्युएसएसडीच्या निर्देशांनुसार (सप्टेंबर 2022 आणि त्यानंतरच्या सुधारणांनुसार), ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या ₹ 1.50 कोटींहून अधिक

किमतीच्या सर्व कामांसाठी बोली क्षमता लागू करायची होती. तथापि, जर एखाद्या कंत्राटदाराने एका आर्थिक वर्षात तीन किंवा अधिक कामे हाती घेतली असतील, तर अशा परिस्थितीत कामे पूर्ण करण्यासाठी त्याची बोली क्षमता मोजली जाईल. पुढे, सविस्तर निविदा सूचनेच्या पूर्व-पात्रता निकषांनुसार, ₹ 50 लाखांपेक्षा जास्त निविदा खर्च असलेल्या कामांसाठी, बोली लावणाऱ्याची बोली क्षमता बोलीच्या मूल्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. कंत्राटदाराची बोली क्षमता[24] विहित सूत्रानुसार ठरवली जाणार होती.

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये, लेखापरीक्षणात असे आढळून आले की, चार प्रकरणांमध्ये बोली क्षमतेसाठीच्या पूर्व-पात्रता निकषांचे मूल्यांकन न करता किंवा चुकीच्या पद्धतीने करून कंत्राटदारांना कामे वाटप करण्यात आली, ज्यामुळे कमी बोली क्षमता असलेल्या बोली लावणाऱ्यांना कामे देण्यात आली आणि एका प्रकरणात आवश्यक बोली क्षमता असूनही बोली लावणाऱ्याला अपात्र ठरवण्यात आले. तपशील **तक्ता 14** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 14: बोली क्षमतेचे मूल्यांकन न करता किंवा चुकीच्या पद्धतीने मूल्यांकन करून वाटप केलेल्या/नाकारलेल्या कामांची प्रकरणे**

| अनु.क्र | विभागाचे नाव | लेखापरीक्षा निरीक्षण |
|---|---|---|
| 1 | कार्य.अभि., जि.प., अहिल्यानगर | पीडब्ल्युएसची दोन कामे, अंबी खालसा आणि पिंपळगाव, किंमत ₹ 1.69 कोटी आणि ₹ 0.96 कोटी, एका कंत्राटदाराला देण्यात (जून 2022 आणि ऑगस्ट 2022) आली. त्या कंत्राटदाराची बोली क्षमता ₹ 2.88 कोटी होती. त्याला यापूर्वीच ₹ 1.77 कोटीची कामे मिळालेली असल्यामुळे, ही दोन कामे दिल्याने एकूण कामांचा खर्च ₹ 4.42 कोटी झाला, जो त्याच्या बोली क्षमतेच्या पलीकडचा होता.. |
| 2 | कार्य.अभि., जि.प., जळगाव | कंत्राटदाराची बोली क्षमता (नोव्हेंबर 2022) ₹ 34.45 कोटी इतकी मूल्यांकीत करण्यात आली होती. तथापि, त्याला (जानेवारी 2023) एकाच दिवसात ₹ 83.24 कोटी किमतीची 104 कामे देण्यात आली. |
| 3 | कार्य.अभि., जि.प., कोल्हापूर | जानेवारी ते फेब्रुवारी 2023 या कालावधीत, उलाढाल प्रमाणपत्रात मालमत्तेच्या खरेदीचा समावेश करून त्याच्या |

[24] बोली क्षमता = [(Ax N x 5)-B] जेथे.
N = ज्या कामासाठी बोली मागवली आहे ते पूर्ण करण्यासाठी निर्धारित वर्षांची संख्या,
A = कंत्राटदाराने मागील पाच वर्षांतील कोणत्याही तीन वर्षांत केलेल्या कमाल मूल्याच्या अभियांत्रिकी कामांची सरासरी, जी {1+ (वर्तमान WPI - कमाल मूल्याची वर्षे WPI)/कमाल मूल्याची वर्षे WPI} या सूत्रानुसार चालू वर्षात (म्हणजेच, निविदा स्वीकारलेल्या वर्षात) अद्ययावत केली जाते x एका वर्षात केलेल्या कामाचे कमाल मूल्य आणि B = विद्यमान वचनबद्धता आणि पूर्ण करावयाची चालू कामे (हातात असलेले काम) यांचे मूल्य.

| अनु.क्र | विभागाचे नाव | लेखापरीक्षा निरीक्षण |
|---|---|---|
| | | बोली क्षमतेचे चुकीचे मूल्यांकन करण्याच्या आधारावर, एका कंत्राटदाराला पीडब्ल्युएस रेट्रोफिटिंगची एकूण ₹ 8.66 कोटीची तीन कामे देण्यात आली. |
| 4 | कार्य.अभि., झेडपी, ठाणे | एका कंत्राटदाराला 2022-23 दरम्यान 18 कामे देण्यात आली. डब्ल्युएसएसडीच्या निर्देशानुसार, पहिली तीन कामे मिळाल्यानंतर, कामाच्या खर्चाचा विचार न करता त्याच्या बोली क्षमतेचे मूल्यांकन करणे आवश्यक होते. तथापि, सप्टेंबर 2022 ते मार्च 2023 या कालावधीत, बोली क्षमतेचे मूल्यांकन न करताच त्याला ₹ 22.16 कोटीची 15 कामे देण्यात आली. त्याचप्रमाणे, दुसऱ्या एका कंत्राटदाराला, मागील वर्षी तीन कामे आधीच देण्यात आलेली असूनही, सप्टेंबर 2022 ते मार्च 2023 या कालावधीत त्याच्या बोली क्षमतेचे मूल्यांकन न करताच ₹ 61.14 कोटीची 50 कामे देण्यात आली. |
| 5 | कार्य.अभि., झेडपी, अहिल्यानगर | तांत्रिक समितीने एका निविदाकाराची ₹ 1.28 कोटींची निविदा, निविदाकाराकडे कामासाठी निविदा क्षमता नसल्याचे कारण सांगून अपात्र ठरवली. तथापि, त्या निविदाकाराची निविदा क्षमता ₹ 12.14 कोटी होती आणि तो त्याच विभागात ₹ 5.25 कोटींची पाच कामे करत होता. त्यामुळे, निविदा क्षमतेच्या आधारावर निविदाकाराला अपात्र ठरवणे हे अनियमित होते. |

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने असे सांगितले की निविदा मागवण्यापूर्वी आणि त्यांची छाननी करण्यापूर्वी सर्व अंमलबजावणी संस्थांना कार्यपद्धतींचे पालन करण्याच्या सूचना निर्गमित केल्या जातील.

### 4.7.3 डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्राचे अनियमित निर्गमन आणि वापर

ई-प्रोक्योरमेंट पोर्टलनुसार, एका वेळी फक्त एकाच वापरकर्ता खात्याशी एक डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (डीएससी) जोडले जाऊ शकते. डीएससी हे प्रत्येक खात्यासाठी युनिक असते आणि सुरक्षित व कायदेशीरदृष्ट्या वैध इलेक्ट्रॉनिक निविदा प्रक्रियेसाठी प्रत्येक वैध युनिक डीएससी एका विशिष्ट अधिकृत खात्याशी जोडलेले असते. पुढे, चारपैकी दोन डीएससी वापरून निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये, निविदा डिक्रिप्ट करून ती पाहण्यापूर्वी, निविदा उघडणारे म्हणून कॉन्फिगर केलेल्या चारपैकी कोणत्याही दोन नियुक्त डीएससी नी डिजिटल स्वाक्षरी करणे आवश्यक असते. या सुरक्षा उपायामुळे एकाच व्यक्तीला संवेदनशील निविदा माहितीवर एकहाती प्रवेश मिळण्यापासून प्रतिबंध होतो.

कोल्हापूर झेडपीच्या तीन जेजेएम कामांच्या निविदा नोंदींच्या छाननीत असे दिसून आले की, निविदा उघडणारे म्हणून कॉन्फिगर केलेल्या एकूण चार डीएससीपैकी, म्हणजेच निविदा उघडण्यासाठी अधिकृत असलेल्यांपैकी, दोन डीएससी एकाच व्यक्तीच्या होत्या, ज्या कोल्हापूर झेडपीत दोन वेगवेगळ्या लॉगिन आयडीद्वारे तयार केल्या गेल्या होत्या. याचा तपशील **तक्ता 15** मध्ये दिला आहे.

**तक्ता 15: वेगवेगळ्या लॉगिन आयडींनी तयार केलेल्या डीएससींची प्रकरणे**

| अनु.क्र | डब्ल्युएसएस चे नाव | निविदा खर्च (रुपये लाखांमध्ये) | निविदा तारीख | बोली उघडण्याची तारीख | टिप्पण्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ठिकपुर्ली, राधानगरी | 361.65 | 23.11.2022 | 07.12.2022 | निविदा उघडण्यास अधिकृत करण्यासाठी कॉन्फिगर केलेल्या 4 डीएससींपैकी, 2 डीएससी कार्य.अभि., आरडब्ल्युएस, कोल्हापूर यांच्या नावे होत्या. निविदा तयार करणारी व्यक्ती देखील तीच होती.. |
| 2 | सिद्धनेर्ली, कागल | 413.87 | 06.12.2022 | 21.12.2022 | |
| 3 | वाडीपीर, करवीर | 358.45 | 15.12.2022 | 22.12.2022 | |

असे निदर्शनास आले की, वरील तीन कामांमध्ये (सिद्धनेर्ली, ठिकपुर्ली, वाडीपीर), तांत्रिक निविदा उघडण्यासाठी/डिक्रिप्ट करण्यासाठी एकाच व्यक्तीच्या डीएससीचा वापर करण्यात आला होता. एकाच व्यक्तीचे वेगवेगळ्या लॉगिन आयडीसह दोन डीएससी तयार करणे आणि नंतर चार मॅप केलेल्या डीएससींपैकी एकाच व्यक्तीच्या दोन डीएससींना एका विशिष्ट निविदेसाठी बोली उघडणारे म्हणून कॉन्फिगर करणे, जिथे तीच व्यक्ती निविदेची निर्माती देखील होती, हे एक संशयास्पद फसवणुकीचे कृत्य आहे आणि ते दुर्भावनापूर्ण हेतू दर्शवते.

कार्य.अभि., आरडब्ल्युएसडी, कोल्हापूर यांनी सांगितले की, निविदा प्रक्रिया केवळ कार्यकारी अभियंत्याद्वारे पार पाडण्यात आली कारण कमी कालावधीत मोठ्या संख्येने निविदांवर प्रक्रिया करायची होती.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की, निविदा अंतिम करण्यापूर्वी सर्व तपासण्यांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व अंमलबजावणी संस्थांना निर्गमित केल्या जातील.

## 4.8 कराराच्या अटींचे उल्लंघन

### 4.8.1 डब्ल्युएसएसचा कार्य-विमा घेण्यामधील अनियमितता

कंत्राटाच्या अटींमधील कलम 61 नुसार, कंत्राटदाराने कामाच्या अंमलबजावणीसाठी विमा संरक्षण मिळवण्याकरिता महाराष्ट्र विमा संचालक (डीओआयएम) यांच्याकडून विमा पॉलिसी घेणे आवश्यक आहे. तथापि, जर कंत्राटदाराला स्थानिक विमा कंपनीकडून विमा घ्यायचा असेल, तर तो डीओआयएम द्वारे मंजूर केलेल्या 'सह-विमा-सह-सेवा' (Coinsurance-come-servicing) व्यवस्थेअंतर्गत असावा. जर कंत्राटदाराने घेतलेली पॉलिसी सह-विमा तत्वावर नसेल, तर ती स्वीकारली जाणार नाही आणि विमा संचालकांनी गणना केलेले प्रीमियम थेट कंत्राटदारांना देय असलेल्या रकमेतून वसूल केले जाईल. कार्यादेशात नमूद केलेल्या अटींमध्ये कार्यादेशाच्या एक महिन्याच्या आत विमा पॉलिसी घेण्याचा समावेश आहे, अन्यथा विभाग कामाच्या अंदाजित खर्चाच्या एक *टक्का* दंड आणि कंत्राटदाराला देय असलेल्या चालू बिलातून ₹ 50,000 वसूल करेल.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाच तालुक्यामधील सात चाचणी-तपासणी केलेल्या डब्ल्युएसएस प्रकल्पांमध्ये, लेखापरीक्षणात असे आढळून आले की, कंत्राटदाराने स्थानिक विमा कंपनीकडून विमा घेण्यापूर्वी डीओआयएम कडून मंजुरी घेतली नव्हती, तसेच विमा पॉलिसी घेताना नियमांचे पालन केले नव्हते. कारण सह-विम्याचे प्रमाण जीआयएफ 60 *टक्के* आणि विमा कंपनी 40 *टक्के* असे ठेवण्याऐवजी, जीआयएफचा वाटा 40 *टक्के* आणि विमा कंपनीचा वाटा 60 *टक्के* असे ठेवण्यात आले होते. शिवाय, ***परिशिष्ट VII*** मध्ये सविस्तरपणे नमूद केल्याप्रमाणे, सातपैकी सहा डब्ल्युएसएस प्रकल्पांमध्ये, काम प्रगतीपथावर असतानाही, बारा ते एकवीस महिन्यांसाठी विमा घेण्यात आला होता आणि पॉलिसीची मुदत संपल्यानंतर त्याचे नूतनीकरण करण्यात आले नाही.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने आवश्यक कारवाई करण्यासाठी निर्देश निर्गमित केले जातील असे सांगितले.

### 4.8.2 अतिरिक्त कामगिरी सुरक्षा आणि सुरक्षा ठेवीपोटी ₹ 0.55 कोटींची कमी मिळालेली रक्कम

सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी दिनांक 27 सप्टेंबर 2018 रोजीच्या शासन निर्णयाअंतर्गत, खालील विनिर्देशानुसार निविदेसाठी ठेवलेल्या अंदाजित खर्चापेक्षा प्राप्त झालेली बोली कमी असल्यास, अतिरिक्त कामगीरी सुरक्षा ठेव (एपीएस) वसुलीसाठी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत:-

| अनुक्रमांक | अंदाजित खर्चापेक्षा कमी बोलीची *टक्के*वारी जी निविदा काढण्यात आली. | एपीएस पुनर्प्राप्त करण्यायोग्य |
|---|---|---|
| (i) | 10 *टक्क्यां*पर्यंत | निविदा काढलेल्या अंदाजित खर्चाच्या एक *टक्का* |
| (ii) | 11 to 15 *टक्के* | **(i)** मधील एपीएस + 11-15 *टक्क्यां*दरम्यानच्या बोलीच्या प्रत्येक *टक्क्या*साठी एक *टक्का.* |
| (iii) | 15 *टक्क्या*पेक्षा जास्त | ***(ii)*** मधील एपीएस + 15 *टक्क्यां*वरील बोलीच्या प्रत्येक *टक्क्या*साठी दोन *टक्के* |

कंत्राटदाराने बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात एपीएस सादर करणे अपेक्षित होते. पुढे, सविस्तर निविदा सूचनेनुसार (परिच्छेद 2), कंत्राटदाराकडून चार *टक्के* सुरक्षा ठेव घेणे अपेक्षित होते, ज्यापैकी प्रारंभिक सुरक्षा ठेव म्हणजेच अंदाजित खर्चाच्या दोन *टक्के* रक्कम निविदेच्या वेळी बँक गॅरंटीच्या स्वरूपात घेणे आणि उर्वरित दोन *टक्के* रक्कम कंत्राटदाराच्या आरए बिलांमधून वसूल करणे अपेक्षित होते.

लेखापरीक्षणामध्ये झेडपी, अहिल्यानगर अंतर्गत राबविण्यात आलेल्या तीन डब्ल्युएसएसच्या चाचणी तपासणी केल्या असता असे निदर्शनास आले की, विहित दराने बँक गॅरंटी स्वीकारण्याऐवजी, विभागाने निविदा सूचना निर्गमित करताना एपीएससाठीचा दर निविदेपेक्षा 10 *टक्क्यांपर्यंत* कमी खर्चासाठी शून्य, निविदेपेक्षा 15 *टक्क्यांपर्यंत* कमी खर्चासाठी दोन *टक्के* आणि निविदेपेक्षा 15 *टक्क्यांहून* अधिक कमी खर्चासाठी चार *टक्के* असा सुधारित केला होता. यामुळे ***परिशिष्ट VIII*** मध्ये सविस्तरपणे नमूद केल्यानुसार, एपीएस आणि ₹ 0.55 कोटींची प्रारंभिक सुरक्षा ठेव कमी प्रमाणात प्राप्त झाली.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश निर्गमित केले जातील असे शासनाने सांगितले.

**निष्कर्ष**

महाराष्ट्रात, जेजेएमच्या सुरुवातीला (ऑगस्ट 2019) 138.54 लाख कुटुंबे होती, त्यापैकी 48.44 लाख कुटुंबांना नळजोडणी मिळाली होती. डिसेंबर 2024 पर्यंत, 129.05 लाख कुटुंबांना (87.90 *टक्के*) नळजोडणी मिळाली होती (यात खाजगी/स्वस्रोताकडून मिळालेल्या 27.74 लाख नळजोडण्यांचा समावेश आहे). अशाप्रकारे, 2024 पर्यंत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला एफएचटीसी देण्याचे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

2019-24 या वर्षात, राज्यात एकूण 51,560 डब्ल्युएसएस सुरू करण्यात आल्या, त्यापैकी 24.64 *टक्के* (12703) डब्ल्युएसएस पूर्ण झाल्या आणि 75.35 *टक्के*

(38857) डब्ल्युएसएस प्रगतीपथावर होत्या. त्यामुळे, राज्यात दिलेल्या नळजोडण्या पूर्णपणे कार्यान्वित नसतील, कारण 75.35 *टक्के* डब्ल्युएसएस अजूनही अपूर्ण आहेत. पाणी पुरवठा योजनांची कमी पूर्तता ही अंमलबजावणीतील अडचणी दर्शवते आणि नियोजन व अंमलबजावणी क्षमतेमधील तफावतीकडे लक्ष वेधते, ज्यामुळे अभियानाची उद्दिष्ट्ये वेळेवर साध्य होण्यावर परिणाम होतो. शिवाय, पुरवठा केलेल्या पाण्याची मात्रा मोजण्यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नव्हती आणि त्यामुळे, लेखापरीक्षणामध्ये पाण्याची पर्याप्तता म्हणजेच किमान 55 एलपीसीडी निश्चित करता आली नाही.

एसडब्ल्युएसएम आणि जिल्हा अंमलबजावणी संस्था यांच्यातील एफएचटीसी माहितीमधील विसंगती, 'हर घर जल' गावांचे चुकीचे प्रमाणीकरण आणि मालमत्तांच्या जिओ-टॅगिंगमधील पुनरावृत्तीमुळे अहवालाच्या विश्वासार्हतेशी तडजोड झाली. प्रत्येक घराला पाणी पुरवठा झाला नसतानाही गावांना 'हर घर जल' गाव म्हणून घोषित करण्यात आले. एसएलएसएससीच्या पूर्वपरवानगीशिवाय कार्यारंभ आदेश निर्गमित करणे, कंत्राटदारांच्या बोली क्षमतेचे चुकीचे मूल्यांकन, डब्ल्युएसएसचा विमा काढण्यातील अनियमितता, अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेवीची अपुरी प्राप्ती यांसारख्या कराराच्या अटींचे उल्लंघन देखील निदर्शनास आले.

**शिफारशी**

- *एफएचटीसी पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी प्रलंबित डब्ल्युएसएस पूर्ण करण्याबरोबरच प्रत्येक कुटुंबाला एफएचटीसी देण्याची प्रक्रिया शासनाने गतीमान करावी आणि डब्ल्युएसएस मंजूर करून प्रदान करण्यापूर्वी जमिनीची उपलब्धता व अनिवार्य मंजुऱ्या सुनिश्चित कराव्यात.*
- *अचूकता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी शासन देखरेख यंत्रणा अधिक मजबूत करू शकते आणि एफएचटीसी माहितीची जुळवाजुळव करू शकते, तसेच जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांचे, विशेषतः एचजीजे गावांचे प्रमाणीकरण, घरगुती जोडण्यांचे मीटरिंग आणि मालमत्ता संरक्षण या बाबतीत काटेकोरपणे पालन करावे.*